**वाचा :-** १) या कार्यालयाचा आदेश क्र. साप्रवि/अस्था१/९४२/१७, दि. १४/६/१७

२) श्री. डी. बी. मुढे, महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांनी त्यांचे कडील दिनांक १०/८/२०१७ व दि. ३०/८/२०१७ रोजीच्या विनंती अजा

३) म. उपसचिव, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, मुबई यांचे कडील क्र.मबाअ -२०१७/प्रक्र.१६१/का-७,दिनांक ०४/०९/२०१७

४) कार्यालयीन मंजुर टिपणी दि. १८/१०/२०१७

---

**नाशिक जिल्हा परिषद,नाशिक**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**जा.क्र.साप्रवि/आस्था-१/१५४० /२०१७**
**नाशिक, दिनांक - २३/ १० /२०१७**

## आदेश

ज्याअर्थि वाचा क्र. ०१ अन्वये श्री.दत्तात्रय भगवान मुढे, महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक, यांना जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.

ज्याअर्थि वाचा क्र. ०३ म. उपसचिव, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, मुबई यांचे कडील दिनांक ०४/०९/२०१७ राजीच्या पत्रान्वये श्री. डी.बी.मुढे, महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना म. आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना व सचिव महिला व बाल विकास यांचेकडेस कामकाजाचा आढावा घेणेसाठी सदर अधिकाऱ्यांनी निश्चित केलेल्या बैठकीस अथवा प्रशिक्षणास उपस्थित रहाणे बंधनकारक व क्रमप्राप्त आहे. त्यामुळे श्री. डी. बी. मुढे, महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडे सोपविण्यात आलेला जिल्हा समाजकल्याण विभागाचा अतिरिक्त कार्यभार काढुन इतर अधिकाऱ्यांकडे सोपविण्याची आवश्यक कार्यवाही तात्काळ करुन शासनास अहवाल सादर करणे बाबत नमुद केलेले आहे. तसेच वाचा क्र. ०२ अन्वये श्री.मुढे, यांनी त्यांचे कडील दिनांक १०/८/२०१७ व दि. ३०/८/२०१७ रोजीच्या विनंती अर्जान्वये त्यांचे कडे असलेला जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक या पदाचा अतिरिक्त कार्यभार काढुन घेणे बाबत विंनती केलेली आहे.

त्याअर्थि श्री. डी. बी. मुढे, महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडे सोपविण्यात आलेला जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.प्रदिप मधुकर चौधरी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जि.प.नाशिक यांचेकडेस अतिरीक्त म्हणुन सुपुर्द करण्यांत येत आहे. श्री. प्रदिप चौधरी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जि.प. नाशिक यांनी त्यांचेकडील पदाचा कार्यभार सांभाळून जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपावेतो स्विकारावा.कार्यभार हस्तांतरण केल्या बाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करण्यात यावे.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

२३/१०

**(दीपककुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति**

श्री.दत्तात्रय भगवान मुढे, महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
श्री. प्रदिप चौधरी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद नाशिक

प्रत -मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग, मंत्रालय, मुबई ३२ यांना माहीतीसाठी सादर.
प्रत -म. उपसचिव, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, मुबई
प्रत -मा. आयुक्त, समाजकल्याण. महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडेस माहीतीसाठी सविनय सादर.

**<u>प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी</u>**

१.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक,
२.प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक
३.सहाय्यक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक
४. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
५.जिल्हा कोषागार अधिकारी,जिल्हा कोषागार कार्यालय नाशिक
६.मुख्य लेखा वित्त अधिकारी जिल्हा परिषद नाशिक
७. साप्रवि ज्ञापन नस्ती / रोखपाल.